गुरुवार दि. २५ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २९४ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जवेरनहता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### जालना जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात पोलिसांचा धडक अभियान

## महिनाभरात ४७० कारवाया, तब्बल १०.२६ कोटींचा मुद्देमाल जप्त

### वाळू तस्करी, दारू, जुगार, गुटखा आणि अमली पदार्थांविरोधात मोठी मोहीम; विविध विभागांच्या संयुक्त कारवाईने गुन्हेगारीवर अंकुश

**जालना -प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात अवैध धंदे आणि बेकायदा व्यवसायांवर पोलिसांनी तसेच संबंधित यंत्रणांनी मोठ्या प्रमाणावर धडक कारवाया केल्या असून, गेल्या एका महिन्याच्या कालावधीत तब्बल ४७० प्रकरणे दाखल करण्यात आली आहेत. या कारवायांमध्ये एकूण १० कोटी २६ लाख ४१ हजार ८५६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

२३ मे २०२६ ते २२ जून २०२६ या कालावधीत करण्यात आलेल्या कारवायांचा आढावा घेतल्यास जालना जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात प्रशासनाने आक्रमक भूमिका घेतल्याचे स्पष्ट होत आहे. जुगार, दारूबंदी, गुटखा, अमली पदार्थ, बेकायदा शस्त्रे, वाळू तस्करी तसेच अन्य कायद्यांतर्गत विविध गुन्ह्यांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली.

सर्वाधिक कारवाया दारूबंदी कायद्यांतर्गत करण्यात आल्या आहेत. या कालावधीत एकूण २५३ गुन्हे दाखल करण्यात आले असून, ३१ लाख ५१ हजार ५७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जिल्ह्यात अवैध दारू विक्री आणि वाहतुकीवर सातत्याने कारवाई सुरू असल्याचे या आकडेवारीवरून दिसून येते.

जुगार अड्ड्यांविरोधात देखील पोलिसांनी विशेष मोहीम राबवली. या अंतर्गत ६६ गुन्हे नोंदविण्यात आले असून, ६० लाख ६७ हजार १८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. शहरासह ग्रामीण भागात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यांवर पोलिसांनी धाडी टाकून ही कारवाई केली.

गुटखा व सुगंधित तंबाखूच्या अवैध साठा आणि वाहतुकीविरोधात २४ गुन्हे दाखल करण्यात आले. या कारवायांमध्ये तब्बल ४६ लाख १७ हजार १५१ रुपयांचा




मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवरही कारवाई करण्यात आली.

अमली पदार्थविरोधी कायद्यांतर्गत (एनडीपीएस) ९ गुन्हे दाखल झाले असून, ५ लाख ५६ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जिल्ह्यात अमली पदार्थांच्या विक्री आणि पुरवठा साखळीवर पोलिसांनी लक्ष केंद्रीत केल्याचे या कारवाईवरून दिसून येते.

बेकायदा शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधातही पोलिसांनी मोहीम राबवली असून, आर्म्स ॲक्ट अंतर्गत २० गुन्हे नोंदविण्यात आले. या कारवायांमध्ये ५० हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.मात्र सर्वाधिक मोठी कारवाई वाळू तस्करीविरोधात करण्यात आली. या कालावधीत ३४ प्रकरणे नोंदवून तब्बल ८ कोटी ८१ लाख ४७ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीविरोधात महसूल विभाग, पोलीस प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी संयुक्तपणे कारवाया केल्याचे समजते.अत्यावश्यक वस्तू कायदा (ई.सी. ॲक्ट) अंतर्गत २ गुन्हे दाखल करून २६ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच सिगारेट व तंबाखूजन्य पदार्थ प्रतिबंधक कायदा () अंतर्गत ५९ कारवाया करून ११ हजार ८०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायद्यांतर्गत ( ) ३ कारवाया करण्यात आल्या असून, १३ हजार ५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जिल्ह्यातील वाढत्या अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली असून, आगामी काळातही अशाच धडक कारवाया सुरू राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत. नागरिकांनीही अवैध धंद्यांची माहिती पोलिसांना देऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

---

## जालना सदर बाजार पोलिसांची धडक कारवाई; विनापरवाना गावठी कट्ट्यासह आरोपी जेरबंद

### *गांधीनगर परिसरात संशयित हालचालींची माहिती मिळताच पोलिसांचा छापा; ₹४५ हजारांचा मुद्देमाल जप्त*

**जालना -प्रतिनिधी**

जालना शहरातील गांधीनगर परिसरात विनापरवाना गावठी कट्टा बाळगून फिरणाऱ्या एका आरोपीस सदर बाजार पोलिसांनी अटक करून त्याच्याकडून सुमारे ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे शहरातील बेकायदा शस्त्र बाळगणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून पोलिसांनी अशा प्रवृत्तींविरुद्ध कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २३ जून



२०२६ रोजी रात्री सुमारे ९.३० वाजण्याच्या सुमारास गांधीनगर येथील रुद्र किराणा दुकानाजवळ एक संशयित व्यक्ती विनापरवाना शस्त्रासह फिरत असल्याची गोपनीय माहिती सदर बाजार पोलिसांना प्राप्त झाली. माहितीची गांभीर्याने दखल घेत पोलीस उपनिरीक्षक सचिन वासुदेव सानप व त्यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत छापा कारवाई केली.

या कारवाईदरम्यान कुमार उर्फ राजकुमार भानुदास शिंदे (वय ३२, *(पान २ वर)*

## बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यस्तरीय आराखड्याची नांदी

### बालहक्क संरक्षण आयोगाच्या पुढाकाराने विविध विभागांची महत्त्वपूर्ण बैठक; शिक्षण, क्रीडा, कला व कौशल्य विकासावर भर

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील बालकांचा सर्वांगीण विकास, त्यांच्या अंगभूत गुणवत्तेची योग्य ओळख आणि लहान वयापासूनच त्यांच्या आवडीनिवडीनुसार शिक्षण, कला, क्रीडा, संस्कृती, कौशल्य व तंत्रज्ञान क्षेत्रात भक्कम पाया उभारण्यासाठी राज्यस्तरावर एकात्मिक धोरण तयार करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या पुढाकाराने महत्त्वपूर्ण बैठक पुणे येथील शासकीय विश्रामगृहातील सभागृहात पार पडली. या बैठकीत राज्यातील



विविध महामंडळे, संशोधन संस्था तसेच शिक्षण आणि महिला-बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी सहभाग घेत बालकांच्या भविष्यासाठी समन्वित कृती आराखडा तयार करण्याबाबत सकारात्मक चर्चा केली. बालकांच्या सुप्त गुणांना योग्य दिशा देण्यासाठी आणि त्यांना विविध क्षेत्रांत सक्षम बनविण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली.

याबाबत माहिती देताना महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे सदस्य डॉ. संजय लाखेपाटील यांनी सांगितले की, बालकांच्या कल, क्षमता आणि आवडीनुसार त्यांचा विकास साधण्यासाठी विविध विभाग आणि संस्थांच्या माध्यमातून एकसंध धोरण राबविण्याच्या दृष्टीने प्राथमिक स्तरावर अत्यंत सकारात्मक चर्चा झाली. भविष्यात या चर्चेच्या आधारे ठोस आराखडा तयार करून राज्यभर प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे. बैठकीस महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष ॲड. संजय पुराणिक, सदस्य गीतांजली बुटी, शुभांगी तांबट, मिलन जंगम, प्रवीण बुजाडे, अतुल देसाई तसेच प्रशासकीय अधिकारी वंदना जैन उपस्थित होत्या. याशिवाय बार्टी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, सारथी, महाज्योती, शबरी आर्थिक विकास महामंडळ, परशुराम आर्थिक विकास महामंडळ, मौलाना आझाद अल्पसंख्याक विकास महामंडळ, शालेय शिक्षण विभाग आणि महिला व बालविकास विभाग यांच्या संशोधन व प्रशासकीय अधिकाऱ्यांनीही बैठकीत सहभाग नोंदविला. बालकांच्या उज्ज्वल *(पान २ वर)*

---

### *निधीसाठी पक्षत्याग करणाऱ्यांविरोधात जालन्यात शिवसेनेचे 'भीक मांगो' आंदोलन*

## सरसकट कर्जमाफीची जोरदार मागणी

### गद्दार खासदारांविरोधात घोषणाबाजी, नागरिकांचाही उत्स्फूर्त सहभाग; सातबारा कोरा करण्याची मागणी

**जालना - प्रतिनिधी**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील काही खासदारांनी निधी मिळत नसल्याचे कारण देत पक्षाला रामराम ठोकल्याच्या पार्श्वभूमीवर जालन्यात शिवसैनिकांनी बुधवारी अनोखे आणि लक्षवेधी आंदोलन छेडले. पक्षत्याग करणाऱ्या खासदारांविरोधात निषेध नोंदविण्यासह शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देऊन सातबारा कोरा करावा, नीट परीक्षा घोटाळ्याप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, तसेच राम मंदिर निधीप्रकरणी चौकशी करावी, या मागण्यांसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जालन्यात 'भीक मांगो' आंदोलन करण्यात आले.

जालना शहरातील मध्यवर्ती बसस्थानक परिसरापासून मामा चौकापर्यंत हे आंदोलन काढण्यात आले. यावेळी शिवसैनिकांनी हातात भिक्षापात्र, फलक आणि निषेधाच्या घोषणा देत नागरिकांकडून प्रतीकात्मक स्वरूपात भीक मागितली. ''जर निधीच सर्वकाही असेल, तर आम्ही जनतेकडून निधी गोळा करू; मात्र विचारांशी आणि पक्षनिष्ठेशी तडजोड करणार नाही,''




असा संदेश या आंदोलनातून देण्यात आला.

आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांच्या प्रश्नांनाही प्राधान्य देण्यात आले. राज्यातील शेतकरी गंभीर आर्थिक संकटातून जात असल्याचा उल्लेख करत २०१९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या कर्जमाफीच्या धर्तीवर पुन्हा एकदा विनाअट सरसकट कर्जमाफी जाहीर करावी आणि शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, अशी मागणी करण्यात आली.

''शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळालीच पाहिजे'', ''गद्दार खासदारांचे करायचे काय, खाली मुंडके वर पाय'' अशा घोषणा देत आंदोलनकर्त्यांनी सरकार आणि पक्षत्याग करणाऱ्या खासदारांविरोधात संताप व्यक्त केला.

बसस्थानक परिसरात झालेल्या या आंदोलनामुळे प्रवासी आणि नागरिकांचे लक्ष वेधले गेले. अनेकांनी आंदोलनाची माहिती जाणून घेतली, तर काहींनी प्रतीकात्मक मदत देऊन आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. विशेष म्हणजे काही नागरिकांनी शंभर आणि पन्नास रुपयांच्या नोटा देण्याचा प्रयत्न केला असता, शिवसैनिकांनी ''या गद्दारांची किंमत फक्त एक रुपयाची आहे, त्यामुळे एक रुपयाचीच भीक द्या,'' असे सांगत प्रतीकात्मक निषेध नोंदविला.

शिवसैनिकांनी आरोप केला की, पक्षाने आमदार-खासदार म्हणून मोठी संधी दिल्यानंतरही काही लोकांनी केवळ सत्तेच्या आणि पैशाच्या मोहापायी पक्षाशी गद्दारी केली. मतदारसंघातील विकासकामांसाठी निधी मिळत नसल्याचे कारण पुढे करण्यात आले असले, तरी अनेक खासदारांना कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध असूनही त्यातील मोठा हिस्सा खर्च झालेला नाही, असा आरोपही आंदोलनकर्त्यांनी केला.

यावेळी अनेक शिवसैनिकांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करत, ''आम्ही अहोरात्र काम *(पान २ वर)*

## कामात हलगर्जीपणा सहन करणार नाही - सीइओ

### प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुकानिहाय आढावा

**जालना - प्रतिनिधी**

केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रशासनाने अधिक तत्परतेने काम करणे आवश्यक आहे. कामात हायगय करणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवरीया यांनी दिला. अंबड येथे आयोजित अंबड व घनसावंगी तालुक्यांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, प्रकल्प संचालक डॉ. सुनील पठारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संदीप पवार, मुख्य वित्त व लेखा अधिकारी राधाकिशन राऊत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी लिंबाजी बारगिरे, जिल्हा कृषी अधिकारी पी. बी. बनसवडे तसेच पद्मा मांझरे उपस्थित होते. पंचायत समिती कार्यालयांमध्ये आयोजित बैठकीत विविध विभागांच्या कामकाजाचा आणि



शासन योजनांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. घरकुल योजना व मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या कामातील प्रगतीबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांना १५ दिवसांत सुधारणा करण्याची मुदत दिली. बैठकीत प्रधानमंत्री आवास योजना, घरकुल योजना, पंचायत विभाग, स्वच्छ भारत मिशन, उमेद अभियान, जल जीवन मिशन, आरोग्य, शिक्षण, महिला व बालविकास, कृषी, लेखा विभाग तसेच मनरेगा योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला.

ग्रामीण भागातील शाळा, अंगणवाडी केंद्रे, ग्रामपंचायत कार्यालये आणि आरोग्य केंद्रांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. तसेच जलकवच अभियानांतर्गत सर्व शासकीय कार्यालयांवर रेन वॉटर हार्वेस्टिंगची व्यवस्था उभारणे आवश्यक असल्याने आगामी १५ दिवसांत हे काम पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले.बैठकीस अंबड गट विकास अधिकारी ज्योती कवडदेवी, घनसावंगी गट विकास अधिकारी प्रदीप कदम, सहाय्यक गट विकास अधिकारी समीर जाधव, जनसंपर्क अधिकारी भगवान तायड यांच्यासह तालुकास्तरीय विभागप्रमुख, क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामविकास अधिकारी उपस्थित होते.

*(पान २ वर)*

# संपादकीय....

## अतिक्रमण हटाव मोहिमः शहराच्या भविष्यासाठीची गुंतवणूक?

जालना शहरात मंठा चौफुली ते न्हावा रोड परिसरात झालेली अतिक्रमण हटाव मोहीम ही केवळ प्रशासनाची नियमित कारवाई नसून शहराच्या भविष्यासाठी उचललेले एक महत्त्वाचे पाऊल मानावे लागेल. महानगरपालिकेच्या इतिहासातील सर्वांत मोठ्या अतिक्रमणविरोधी कारवाईत तब्बल १४७ अतिक्रमणे हटविण्यात आली. त्यामुळे हा विषय केवळ अतिक्रमणधारक आणि प्रशासन यांच्यातील संघर्ष म्हणून न पाहता शहराच्या विकासाच्या व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे.

कोणतेही शहर केवळ इमारती, रस्ते आणि बाजारपेठांमुळे विकसित होत नाही. त्यासाठी नियोजन, मोकळे रस्ते, सुरक्षित वाहतूक, प्रभावी जलनिस्सारण व्यवस्था आणि सार्वजनिक जागांचे संरक्षण आवश्यक असते. ज्या शहरांमध्ये सार्वजनिक जागांवर अनधिकृत अतिक्रमणे वाढतात, त्या शहरांचा विकास खुंटतो. जालना शहरातही गेल्या अनेक वर्षांपासून रस्ते, नाले, पदपथ आणि सार्वजनिक जागांवर अतिक्रमणे वाढत गेली आणि त्याचे दुष्परिणाम नागरिकांना भोगावे लागले.

अतिक्रमणाचा सर्वांत मोठा परिणाम वाहतुकीवर होतो. अरुंद झालेले रस्ते, वाढती वाहतूक कोंडी, अपघातांची शक्यता आणि आपत्कालीन सेवांना होणारा विलंब हे प्रश्न गंभीर बनतात. पावसाळ्यात नाल्यांवरील अतिक्रमणांमुळे पाण्याचा निचरा होत नाही आणि अनेक भागांत पाणी साचते. परिणामी सामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागतो, तर शहराच्या विकासाच्या योजना देखील रखडतात.

वास्तविक, अतिक्रमणाचा प्रश्न एका दिवसात निर्माण झालेला नाही. अनेक वर्षांपासून राजकीय हस्तक्षेप, प्रशासनातील शिथिलता, निवडक कारवाया आणि तडजोडीच्या धोरणामुळे ही समस्या वाढत गेली. वेळोवेळी नोटिसा देण्यात आल्या, काही ठिकाणी कारवाया झाल्या; मात्र सातत्याचा अभाव असल्याने पुन्हा अतिक्रमणे उभी राहत गेली. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाबद्दल नाराजी निर्माण झाली होती.

अशा परिस्थितीत महानगरपालिका प्रशासनाने घेतलेली धडक कारवाई महत्त्वाची ठरते. कारवाई मोठी असली तरी तिचा उद्देश दंडात्मक नसून सार्वजनिक जागा नागरिकांसाठी उपलब्ध करून देणे हा आहे. शहरातील रस्ते मोकळे करणे, वाहतुकीला गती देणे, नाल्यांची अडचण दूर करणे आणि भविष्यातील विकासकामांसाठी जागा उपलब्ध करणे ही या मोहिमेची मूलभूत उद्दिष्टे आहेत. तथापि, प्रशासनासमोर मोठे आव्हान म्हणजे या कारवाईत सातत्य राखणे होय. अतिक्रमण हटवल्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी अनधिकृत बांधकामे किंवा व्यवसाय सुरू होऊ नयेत यासाठी कठोर देखरेख आवश्यक आहे. कायद्याची अंमलबजावणी सर्वांसाठी समान झाली तरच नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास दृढ होईल. अतिक्रमणधारकांनीही या प्रश्नाकडे केवळ उपजीविकेचा किंवा वैयक्तिक नुकसानीचा प्रश्न म्हणून पाहू नये. सार्वजनिक जागा या संपूर्ण समाजाच्या मालकीच्या असतात. शहराच्या विकासात अडथळा ठरणारी अतिक्रमणे स्वखर्चाने हटवून प्रशासनाला सहकार्य करणे ही नागरिकांची सामाजिक जबाबदारी आहे. जालना शहराला भविष्यात अधिक नियोजनबद्ध, सुरक्षित आणि विकासाभिमुख बनवायचे असेल तर अतिक्रमण हटाव मोहीम ही सातत्याने राबवावी लागेल. मंठा चौफुली येथील कारवाई हा त्याचा प्रारंभ मानला पाहिजे. ही मोहीम कोणत्याही दबावाशिवाय, भेदभावाशिवाय आणि सर्वांसाठी समान निकषांवर राबविली गेली तरच शहराला त्याचा खरा लाभ मिळेल. आजचा प्रश्न केवळ एवढाच नाही की अतिक्रमणे हटविण्यात आली का? खरा प्रश्न असा आहे की, ही कारवाई जालना शहराच्या भविष्यातील विकासासाठी गुंतवणूक ठरणार का? जर प्रशासनाची इच्छाशक्ती, नागरिकांचे सहकार्य आणि कायद्याचे समान पालन कायम राहिले, तर या प्रश्नाचे उत्तर निश्चितच होकारार्थी असेल.

## अतिक्रमण हटाव मोहीम सुरु, पण पुन्हा अतिक्रमण झाल्यास जबाबदार कोण?' ॲड. महेश धन्नावत यांचा सवाल; उघड्या मॅनहोलचा प्रश्न अधिक गंभीर

**बदलता महाराष्ट्र वृत्तसेवा**

जालना (प्रतिनिधी) - जालना शहरात सध्या महानगरपालिकेच्या वतीने अतिक्रमण हटाव मोहीम जोरात राबवली जात आहे. मुख्य रस्त्यांवरील टपऱ्या, हातगाडे व अनधिकृत बांधकामे जेसीबी लावून हटवली जात आहेत. मात्र, ही कारवाई केवळ कागदी देखावा ठरू नये, असा सवाल ॲड. महेश धन्नावत यांनी उपस्थित केला आहे.

ॲड. धन्नावत म्हणाले, ''अतिक्रमण हटवणे सोपे आहे, पण ते पुन्हा होणार नाही याची हमी कोण देणार? आज जे हटवले जात आहे, ते उद्या पुन्हा त्याच जागी उभे राहणार नाही याची काय योजना आहे? संबंधित प्रभागाचे स्वच्छता निरीक्षक किंवा प्रभाग अधिकारी याची जबाबदारी घेणार का? जर पुन्हा अतिक्रमण झाले तर त्यांनी स्वतःहून अहवाल देऊन ते तात्काळ पाडण्याची हमी द्यावी. अन्यथा ही मोहीम केवळ 'पेपर स्टंट' ठरेल आणि महापालिकेचा पैसा व वेळ वाया जाईल.''

ते पुढे म्हणाले की, अतिक्रमणापेक्षाही गंभीर प्रश्न जालन्यातील उघड्या मॅनहोलचा आहे. कालीकुर्ती, सदर बाजार, जुना जालना भागात अनेक ठिकाणी मॅनहोलची झाकणे तुटलेली किंवा उघडी आहेत. काही झाकणे जड असल्याने सफाई कामगार ती काढून बाजूलाच ठेवतात. पावसाळ्यात रस्त्यांवर पाणी साचल्याने ही मॅनहोल मृत्यूचे सापळे ठरत आहेत.

''अतिक्रमण हटवल्याने वाहतूक सुरळीत होईल, पण उघड्या मॅनहोलमध्ये पडून एखाद्याचा जीव गेला तर त्याला जबाबदार कोण? महापालिका आयुक्तांनी याचे उत्तर द्यावे. अतिक्रमण मोहिमेसोबतच शहरातील सर्व मॅनहोलचे स्ट्रक्चरल ऑडिट करून १५ दिवसांत झाकणे बसवण्याची डेडलाईन द्यावी,'' अशी मागणी ॲड. धन्नावत यांनी केली.

नागरिकांनीही प्रशासनाला सवाल केला आहे की, अतिक्रमण हटवताना जेवढी तत्परता दाखवली जाते, तेवढीच तत्परता मॅनहोल दुरुस्तीसाठी का दाखवली जात नाही? कागदावर मोहीम यशस्वी दाखवण्यापेक्षा जमिनीवर काम दिसले पाहिजे, अन्यथा जनतेचा रोष वाढेल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

## राज्यात बाल विवाहाचे प्रमाण पुढील पाच वर्षात १० टक्क्याच्या आत आणण्याचे उद्दिष्ट

### -महिला व बाल विकास मंत्रीआदिती तटकरे

**मुंबई - प्रतिनिधी**

राज्यात बालविवाह रोखण्यासाठी शासन व प्रशासनामार्फत आवश्यक कार्यवाही व प्रभावी उपाय योजना राबविण्यात येत असून पुढील पाच वर्षांत बालविवाहाचे प्रमाण १० टक्याच्या आत आणण्याचे उद्दिष्ट असल्याचे महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानसभेत सांगितले.

विधानसभा सदस्य अतुल भातखळकर यांनी या विषयी विचारलेल्या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य नाना पटोले यांनी सहभाग घेतला. यावेळी त्या बोलत होत्या.

मंत्री तटकरे म्हणाल्या की, राज्याच्या कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार २०१९ ते २०२१ या कालावधीत देशातील बालविवाहाचे प्रमाण २३.३ टक्के होते, तर महाराष्ट्रात ते २१.९ टक्के होते. २०२३-२४ मधील निवडक जिल्ह्यांच्या सर्वेक्षणात देशाची सरासरी २०.१ टक्क्यांवर आली आहे. महाराष्ट्रात बालविवाहाचे प्रमाण घटून १९.७ टक्क्यांवर आले आहे.

बालविवाह प्रतिबंधासाठी करण्यात आलेल्या कारवाईबाबत माहिती देताना मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, सन २०१८-१९ मध्ये १८७, सन २०१९-२० मध्ये २४०, सन २०२०-२१ मध्ये ५१९, सन २०२१-२२ मध्ये ८३१, सन २०२२-२३ मध्ये ९३० बालविवाह रोखण्यात आले. सन २०२२-२३ मध्ये ८१ एफआयआर दाखल करण्यात आले. तर सन २०२३-२४ मध्ये १,२५३ सन २०२४-२५ मध्ये १,४९५ बालविवाह रोखण्यात आले. चालू वर्षात आतापर्यंत १,४३४ बालविवाह रोखण्यात आले असून याप्रकरणी दोषींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.मंत्री तटकरे म्हणाल्या की, बालविवाह रोखण्यासाठी स्थानिक प्रशासनाची कारवाई अधिक प्रभावी करण्यात येत असून गुन्हे नोंदविण्याचे प्रमाणही वाढले आहे. राज्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कृती दल, ग्राम संरक्षण कक्ष आणि तालुका व ग्रामपंचायत स्तरावरील यंत्रणा कार्यरत आहे.

# विशेष सखोल मतदार पुनरीक्षण मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे

## मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यात राबविण्यात येत असलेल्या विशेष सखोल मतदार पुनरीक्षण (  - ) मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व्यापक जनजागृती, लोकप्रतिनिधी व सामाजिक संस्थांचा सहभाग तसेच प्रशासनातील सर्व यंत्रणांमध्ये समन्वय आवश्यक असून, कोणताही पात्र नागरिक मतदार यादीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश अप्पर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विशेष सखोल मतदार पुनरीक्षण मोहिमेच्या आढावा व मार्गदर्शन बैठकीत ते बोलत होते. यावेळी विभागातील जिल्हाधिकारी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी, मतदार नोंदणी अधिकारी तसेच निवडणूक विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुख्य निवडणूक अधिकारी श्री. चोक्कलिंगम म्हणाले की, मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक व अद्ययावत करण्यासाठी निवडणूक आयोगाने विशेष सखोल मतदार पुनरीक्षण मोहीम हाती घेतली आहे. नागरिकांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी मदत कक्ष स्थापन करून त्यांना वस्तुनिष्ठ माहिती उपलब्ध करून द्यावी. स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना, मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) आणि स्वयंसेवक यांना विश्वासात घेऊन ही मोहीम राबविण्यात यावी. भारतीय संविधान, लोकप्रतिनिधी कायदा तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या संबंधित निर्णयांचा अभ्यास करून कायदेशीर तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात यावी. कोणत्याही पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीतून वगळले जाणार नाही, तसेच अपात्र नोंदींची काटेकोर छाननी करूनच आवश्यक निर्णय घेण्यात यावेत, असे त्यांनी स्पष्ट केले. मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी करण्यात आलेल्या पूर्वतयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मतदान केंद्रनिहाय उद्दिष्टे निश्चित करून मतदार यादी मॅपिंगच्या कामाला गती देणे, आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, प्रशिक्षण कार्यक्रम, पडताळणी प्रक्रिया तसेच अर्ज व्यवस्थापन यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. विशेष सखोल मतदार पुनरिक्षण मोहिमेअंतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) मतदारांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन गणना अर्जांचे वितरण व संकलन करणार आहेत. यावेळी मतदारांची माहिती, नाव, पत्ता, छायाचित्र तसेच या माहितीतील विसंगती आणि इतर तपशीलांची पडताळणी केली जाणार आहे. तसेच अनुपस्थित, स्थलांतरित, मृत अथवा डुप्लिकेट नोंदींची तपासणी करून मतदार यादी अधिक अचूक करण्यावर भर देण्यात येणार आहे. ही संपूर्ण अचूक माहिती डिजीटल पध्दतीने अपडेट करण्याचे काम वेळेत झाल्याचीही संबंधितांनी खात्री करून घेण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली. श्री. चोक्कलिंगम यांनी विशेष सखोल मतदार पुनरिक्षण मोहीम राबविण्यासंदर्भातील संबंधित अधिकारी यांच्या अडचणी व शंकांचे निरसन करत त्यांना मार्गदशन केले तसेच त्यांनी केलेल्या सुचनांची नोंद घेत विशेष सखोल मतदार पुनरिक्षण मोहीम लोकशाही बळकट करण्यासाठी महत्त्वपूर्ण असून, प्रशासन, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागातून ही मोहीम यशस्वी करण्याचे आवाहन केले. बैठकीत विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यातील तयारीची माहिती सादर केली. प्रशिक्षण, जनजागृती, मॅपिंग, बीएलओ नियुक्ती, अर्ज वितरण व पडताळणी प्रक्रिया यासाठी आवश्यक ती सर्व तयारी पूर्ण करण्यात आल्याचे सांगण्यात आले. यावेळी नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, परभणी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, धाराशिव जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, हिंगोली जिल्हा अधिकारी राहुल गुप्ता, जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी, मंजुषा मिसकर यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# पान १ व ४ वरुन...

### जालना सदर...

रा. पानेवाडी, ता. घणसावंगी, जि. जालना, सध्या रा. गांधीनगर, जालना) यास ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे लोखंडी धातूपासून तयार करण्यात आलेला देशी बनावटीचा गावठी कट्टा व एक मॅगझिन आढळून आले.

सदर शस्त्र बाळगण्याबाबत आरोपीकडे कोणताही वैध परवाना नसल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पोलिसांनी तत्काळ शस्त्र जप्त केले. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची अंदाजे किंमत सुमारे ४५ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.

या प्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५३७/२०२६ नोंद करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता () कलम ३(५), आर्म्स ॲक्ट कलम ३/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून पुढील तपास पोहेकॉ/३५७ शिंगणे हे करीत आहेत.

पोलिसांनी शहरात बेकायदा शस्त्र बाळगणाऱ्या व्यक्तींविरोधात कारवाईची मोहीम अधिक तीव्र करण्याचे संकेत दिले असून, नागरिकांनी संशयास्पद हालचाली अथवा बेकायदा शस्त्रांबाबतची माहिती तात्काळ पोलिसांना देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. तेगबीरसिंह संधू, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक श्री. संदीप भारती यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन सानप आणि त्यांच्या डी.बी. पथकातील जगनाथ जाधव, रामप्रसाद रंगे, धनाजी कावळे, शिंगणे, दुर्गेश गोफणे, अजीम शेख, भगवान मुंजाळ, राहुल कटकम्□ व धनाजी लोढे यांनी ही यशस्वी कारवाई केली.

### बालकांच्या...

भविष्यासाठी विविध विभाग आणि संस्थांना एका व्यासपीठावर आणणारी ही बैठक राज्यातील बालविकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल मानली जात असून, आगामी काळात याचे सकारात्मक परिणाम दिसून येतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### सरसकट कर्जमाफीची...

केले, रक्ताचे पाणी केले आणि कुठल्याही अपेक्षेशिवाय केवळ शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांसाठी काम केले. मात्र काही लोकांनी वैयक्तिक स्वार्थासाठी पक्षाचा त्याग केला,'' अशा भावना व्यक्त केल्या.

जिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव यांनी सांगितले की, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि नेते संजय राऊत यांनी दिलेल्या आदेशानुसार गद्दारांविरोधात जनजागृती सुरू राहील. शहरप्रमुख दीपक रणनवरे यांनी निधी न मिळाल्याचे कारण पुढे करून पक्षत्याग करणाऱ्यांवर टीका केली आणि सत्ताधारी पक्षाने अशा लोकांची खरी भूमिका ओळखावी, असे मत व्यक्त केले.

महिला जिल्हा संघटक रूपम घुगे यांनी नीट परीक्षेतील कथित गैरप्रकारांचा संदर्भ देत, ''ज्याप्रमाणे परीक्षेतील अनियमिततेनंतर पुन्हा परीक्षा घेण्याची वेळ आली, त्याचप्रमाणे पक्षत्याग करणाऱ्या खासदारांनी राजीनामा देऊन पुन्हा जनतेचा कौल घ्यावा,'' अशी मागणी केली.

जिल्हा संघटक भानुदास घुगे यांनीही आपल्या भाषणात पक्षनिष्ठा आणि विचारांशी प्रामाणिक राहण्याचे आवाहन केले. त्यांनी शेतकरी, बेरोजगारी, शिक्षण आणि जनतेच्या प्रश्नांवर सरकारने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली.

या आंदोलनात जिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव, जिल्हा संघटक भानुदास घुगे, उपजिल्हाप्रमुख भगवान कदम, परमेश्वर जगताप, महिला जिल्हा संघटक रूपम घुगे, तालुकाप्रमुख कैलास पुंगळे, दिनेश काकडे, गणपत दराडे, रामेश्वर फंड, शहरप्रमुख दीपक रणनवरे, संदीप झारखंडे, महेश पुरोहित, मोहम्मद फैसल, चेतन भुरेवाल, वसीम खान, डॉ. राजेश राऊत, संतोष क्षत्रिय, संतोष सुरडकर, विलास करतारे, सुदामराव काळे, संजय जाधव, तुळशीराम काळे, बाळासाहेब पाखरे, फारुख पठाण, अनंत वैद्य, माधवराव बाहेकर, रामराव वैद्य, जीवन वैद्य यांच्यासह शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, किसान सेना आणि विविध आघाड्यांचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जालन्यातील हे 'भीक मांगो' आंदोलन सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत असून, आगामी काळातही पक्षनिष्ठा आणि शेतकरी प्रश्नांवर अशाच प्रकारची जनजागृती आंदोलने सुरू ठेवण्याचा इशारा शिवसेना पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

### कामात हलगर्जीपणा...

**सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. घरकुल किंवा इतर कोणत्याही प्रकरणात सकारात्मक प्रतिसाद न देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची दिरंगाई सहन केली जाणार नाही.**
**- डॉ. कृष्ण कांत कनवरीया**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद जालना.**

### अपर जिल्हादंडाधिकारी...

भोकरदन यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुका, सभा, मोर्चा यांना लागु राहणार नाही. हा आदेश संपुर्ण जिल्ह्यासाठी दि.२४ जुन,२०२६ रोजीच्या ६.०० वाजेपासुन ते दि. ७ जुलै,२०२ रोजीचे रात्री १२.०० वाजेपर्यंत अंमलात राहील. असे आदेशात नमुद करण्यात आले आहे.

### बँकेच्या हलगर्जीपणाचा...

आयोगाने राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या *स्टेट बँक ऑफ इंडिया विरुद्ध अमितेश मजुमदार* या प्रकरणाचा आधार घेतला. बँकेचा हलगर्जीपणा हा सेवेतील त्रुटी असल्याचे स्पष्ट करून आयोगाने तक्रार अंशतः मंजूर केली आणि वरीलप्रमाणे नुकसान भरपाईचे आदेश दिले.या निकालावर प्रतिक्रिया देताना **ॲड. महेश एस. धन्नावत** म्हणाले, ''ग्राहक आयोगाचा हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण असून तो सर्वसामान्य ग्राहकांच्या हक्कांना बळकटी देणारा आहे. बँका आणि वित्तीय संस्थांनी ग्राहकांनी तारण ठेवलेल्या कागदपत्रांना केवळ एक वस्तू न मानता त्याची विश्वस्त म्हणून जबाबदारी स्वीकारली पाहिजे. कर्जफेडीत कसूर झाली असली तरी, बँकेला कागदपत्रे गहाळ करण्याच्या गंभीर चुकीतून सूट मिळू शकत नाही, हा या निकालाचा स्पष्ट संदेश आहे. या निर्णयामुळे बँकिंग क्षेत्रात अधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण होण्यास मदत होईल.''

### जालन्यात महावितरणच्या...

केंद्रांतर्गत येणारे गोकुळनगरी, दुःखी नगर, बचत भवन, शनी मंदिर हे फिडर आणि इंदेवाडी, अंतरवाला, सामनगाव, लक्ष्मीकांत नगर हे फिडरही ओव्हरलोडिंगच्या समस्येने ग्रासले आहेत.

३०० कोटींच्या निधीच्या वापरावरून प्रश्नचिन्ह

शासनाने आणि ऊर्जा मंत्र्यांनी शहराच्या वीज व्यवस्थेसाठी ३०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. मात्र, मूळ सिस्टीमच ओव्हरलोड असल्याने या पैशांची योग्य पद्धतीने गुंतवणूक न करता इकडे-तिकडे उधळपट्टी होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. जुन्या झालेल्या एच.टी. आणि एल.टी. लाईनच्या तारांमुळेही तांत्रिक बिघाड वाढले आहेत.

सर्वे क्र. ४८८ मधील ३३ केव्ही उपकेंद्राचे तातडीने १३२ केव्ही केंद्रामध्ये रूपांतर करण्यासाठी प्रस्ताव मागवून मंजुरी द्यावी, ओव्हरलोड फिडरचे विभाजन करून सिरसवाडी येथे नवीन ३३ केव्ही उपकेंद्र उभारण्यात यावे, १३२ केव्ही सबस्टेशनसाठी सर्वे क्र. ४८८ मध्ये आणि सिरसवाडी येथे ३३ केव्ही उपकेंद्रासाठी गायरान जमीन उपलब्ध करून द्यावी, अत्यंत जुन्या झालेल्या एच.टी. व एल.टी. वीज तारा बदलण्यात याव्यात आदि मागण्यांचा समावेश आहे.

वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे महावितरणचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे. तसेच शेतकरी, व्यापारी, हॉटेल व्यावसायिक, वकील, डॉक्टर आणि शासकीय कार्यालयांचे कामकाज ठप्प होत आहे. या समस्येची मायबाप सरकारने दखल घेऊन संबंधित विभागांना त्वरित आदेश द्यावेत, अशी मागणी निवेदक बाबासाहेब वानखेडे यांच्यासह निलेश वानखेडे, सुमित्रा ढगे, ॲड. योगेश गाडगे, गोकुळ स्वामी, सरपंच प्रशासक एस.आर. ढगे, इंजि. शाम जाधव, मच्छिंद्र वाहुळकर, भगवान बट्टूहकर, सुभाष गाडगे, हर्षवर्धन रामदास, सदानंद हिवाळे, विनोद पानसरे, श्रीमंत बनसोडे, चंदन वाहुळकर, लिंबाजी ठोंबरे, हरिष वाहुळकर, अनिल भकाजी, सतीश वाहुळकर, दिलीप हिवाळे, यांच्यासह अनेकांनी केली आहे.

### धावडा येथील गट...

कार्यवाही करण्यापूर्वी संबंधित शेतकऱ्यांना कोणतीही नोटीस देण्यात आली नाही, तसेच त्यांची बाजू मांडण्याची संधीदेखील देण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे ही कार्यवाही नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांच्या विरोधात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे उल्लंघन?

ग्रामस्थांच्या मते, कोणत्याही व्यक्तीचा मालकी हक्क प्रभावित करणारा निर्णय घेण्यापूर्वी संबंधित पक्षाला नोटीस देणे, सुनावणीची संधी उपलब्ध करून देणे आणि सर्व पुरावे विचारात घेणे आवश्यक असते. मात्र या प्रकरणात अशा कोणत्याही प्रक्रियेचे पालन करण्यात आले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

त्यामुळे संबंधित आदेश तात्काळ रद्द करून सातबारावरील मूळ नावे पुन्हा नोंदविण्यात यावीत, तसेच भविष्यात कोणतीही कार्यवाही करावयाची असल्यास चौकशी समितीने सुचविलेल्या कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

**ग्रामस्थ आक्रमक; न्याय मिळविण्यासाठी लढा सुरूच**

या प्रकरणामुळे धावडा गावात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामस्थांनी न्याय मिळेपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. प्रशासनाने संबंधित सर्व कागदपत्रांची फेरतपासणी करून योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणीही करण्यात येत आहे.

निवेदन सादर करताना विरेंद्र देशमुख, संतोष टेंभरे, अशापाक शेख, सय्यद शकुर, शंकर सपकाळ, सुधाकर तुतोंडे, फेरोज खान, शेख आरेफ, अमिन सय्यद, समाधान सपकाळ यांच्यासह सुमारे ५० ते ६० ग्रामस्थ उपस्थित होते.

# नो युवर डॉक्टर क्यूआर प्रणालीद्वारे डॉक्टरांची नोंदणी तपासता येणार – वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

**मुंबई - प्रतिनिधी**

राज्यातील नागरिकांना खऱ्या आणि नोंदणीकृत डॉक्टरांची माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेमार्फत नो युवर डॉक्टर ही क्यूआर कोड आधारित प्रणाली सुरू करण्यात आली आहे. क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर संबंधित डॉक्टर नोंदणीकृत आहे की नाही याची माहिती तात्काळ मिळू शकते, अशी माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी विधानसभेत दिली.

सोलापूर जिल्ह्यातील बोगस डॉक्टरांवर कारवाईबाबत आमदार विजय देशमुख यांनी प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री मुश्रीफ बोलत होते. ते म्हणाले की, राज्यात सध्या सुमारे १ लाख ४० हजार नोंदणीकृत डॉक्टर सेवा देत असून दरवर्षी सुमारे १२ हजार ८२४ नवीन एमबीबीएस डॉक्टर वैद्यकीय क्षेत्रात दाखल होत आहेत. एमबीबीएस, पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण, आयुर्वेद, युनानी, बीएएमएस, बीएचएमएस, डेंटल आदी वैद्यकीय शाखांची आवश्यक नोंदणी न करता वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींचा समावेश बोगस डॉक्टरांमध्ये होतो. राज्यात २०१५ ते २०२६ या कालावधीत अशा प्रकारच्या ८९ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. बोगस वैद्यकीय व्यवसाय रोखण्यासाठी आणि त्यावर कारवाई करण्यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालानुसार जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय आणि तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समित्या कार्यरत करण्यात आल्या आहेत. या समित्यांवर आता लोकप्रतिनिधींची नियुक्ती करून त्याची पुनर्रचना करण्यात येईल. अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांवर कठोर शिक्षेची तरतूद असल्याचे नमूद करताना मंत्री मुश्रीफ म्हणाले की, नॅशनल मेडिकल कमिशनच्या शिफारशीनुसार अशा व्यक्तींना एक वर्षापर्यंत कारावास किंवा ५० लाख रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकते; तसेच महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टिशनर्स अधिनियमांतर्गत दोन वर्षांपर्यंत कारावास किंवा दंड आणि पुनरावृत्ती झाल्यास १० वर्षांपर्यंतच्या कारावासाची तरतूद आहे. पीसीपीएनडीटी कायद्यात आवश्यक दुरुस्ती करण्याबाबत शासन सकारात्मक असून नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्यांना कठोर शिक्षा होईल.

या प्रश्नोत्तराच्या तासात विधानसभा सदस्य राहुल कुल आणि राहुल पाटील यांनीही उपप्रश्न विचारले.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या अर्ज तपासणीस मुदतवाढ

**जालना - प्रतिनिधी**

शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या/शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या तसेच निवास, भोजन व अन्य सुविधांअभावी पुढील शिक्षण घेऊ शकत नसलेल्या अनु. जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांपैकी ११ वी, १२ वी तसेच १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विविध स्तरावरील महाविद्यालयात/ शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहातील मुलां/मुलींप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणीक साहित्य व इतर आवश्यक सुविधा स्वतः उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यामध्ये थेट जमा करण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सदर योजनेचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने https://hmas.mahait.org/ या संकेतस्थळावर दि. ३० मे २०२६ पर्यंत स्विकारण्यात आलेले होते. महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांच्या निर्देशानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अर्जाच्या तपासणीसाठी अंतिम मुदत वाढविण्यात आली आहे. स्वाधार योजनेच्या अर्जामध्ये विविध त्रुटी आढळून आल्याने तसेच विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या मागण्यांचा विचार करून अर्ज तपासणी प्रक्रिया पूर्ण ७ जुलै २०२६ पर्यंत विद्यार्थ्यांना अर्जातील त्रुटींची पूर्तता करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. आतापर्यंत ऑनलाईन पोर्टलवर ज्या विद्यार्थ्यांना २१० विद्यार्थ्यांना सेंट बैंक करण्यात आले आहे अशा विद्यार्थ्यांनी त्रुटीचे कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करावयाचे आहेत.

# आणीबाणीमुळे लोकांना लोकशाहीचे महत्व कळले

आज २५ जून, भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू करण्याच्या घटनेला आज ५१ वर्ष पूर्ण झाली. बरोबर ५१ वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी लागू झाली. १२ जून १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द करून त्यांना पुढील सहा वर्ष निवडणूक लढवण्यास बंदी घातली. राजनारायण यांनी इंदिरा गांधी यांनी १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत गैरव्यवहार केला असा आरोप करून खटला दाखल केला होता. या खटल्याच्या निकाल १२ जूनला लागला. या निकालानंतर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द झाल्याने त्यांनी पंतप्रधानपद सोडावे अशी मागणी होऊ लागली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. परंतु सर्वोच्च न्यायालयाचे सुट्टीच्या काळातील न्यायाधीश व्ही. आर कृष्ण अय्यर यांनी उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती देण्यास नकार दिला मात्र सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत इंदिराजींना पंतप्रधान पदावर राहण्यास मुभा दिली. हा निर्णय आल्यानंतर पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी स्वतःची सत्ता टिकवण्यासाठी २५ जून १९७५ च्या रात्री देशात आणीबाणी लागू केली. आणीबाणीच्या मसुद्यावर तत्कालीन राष्ट्रपती फकरुद्दीन अली अहमद यांनी रात्री बारा वाजता स्वाक्षरी केली. आणीबाणी लागू झाल्यानंतर इंदिरा गांधी यांच्या हातात अनिर्बंध सत्ता आली. माध्यमांची मुस्कटदाबी सुरू झाली. जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जॉर्ज फर्नांडिस, चौधरी चरणसिंग, मोरारजी देसाई, नानाजी देशमुख, मधु दंडवते, रामकृष्ण हेगडे, सिखंदर बख्त, लालूप्रसाद यादव, मुलायमसिंग यादव, रामविलास पासवान यांच्यासह अनेक मोठे नेते तसेच पत्रकारांना मिसा कायद्याखाली तुरुंगात डांबण्यात आले. आणीबाणीच्या २१ महिन्यांच्या कालावधीत ११ लाख लोकांना तुरुंगवास भोगावा लागला. सक्तीची नसबंदी आणि झोपडपट्टी हटवून शहरे सुशोभित करण्याच्या मोहिमेत लोकांवर जुलूम जबरदस्ती करण्यात येऊ लागले. त्यामुळे देशभर भीतीचे आणि संशयाचे वातावरण निर्माण झाले. सुरवातीला दहशतीत असणारे नागरिक या अन्यायाविरुद्ध नंतर रस्त्यांवर उतरू लागले.

सामाजिक कार्यकर्ते, नेते, अभिनेते, कलाकार, बुद्धीवादी लोक, साहित्यिक असे सारे लोक आणीबाणीच्या विरोधात एकवटले. सर्व स्तरातून आणीबाणीला विरोध होऊ लागला. संपूर्ण देश आणीबाणीच्या विरोधात एकवटल्याचे पाहून इंदिरा गांधी यांनी आणीबाणी सैल करून १९७७ साली लोकसभेच्या निवडणुका घेतल्या. या निवडणुकीत इंदिरा गांधी, संजय गांधी यांचा दारुण पराभव झाला. विरोधी पक्ष असलेल्या जनता पार्टीचे सरकार आले. मोरारजी देसाई हे पंतप्रधान बनले. पण या सरकारमध्ये कमालीचा अंतर्विरोध होता. हाती आलेली सत्ता या विरोधी पक्षांना टिकवता आली नाही. पुढील निवडणुकीत इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधान बनल्या. आणीबाणी ही स्वतंत्र भारताच्या इतिहासातील काळे पर्व म्हणून ओळखली जाते. ५० वर्षांपूर्वी घडलेल्या या दिवसातील घडामोडींनी देशाला लोकशाहिवरील श्रध्येचे महत्त्व काय आहे याची जाणीव करून दिली. भारताच्या इतिहासातील या घटनेची आठवण म्हणजे कोणाला चांगले वाईट ठरवणे नसून लोकशाहीची ताकद व सामर्थ्य यांचे स्मरण होय.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# आरटीओ कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप मागे; कर्मचारी हिताला प्राधान्य देत विविध मागण्या मान्य

## - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निवेदन

**मुंबई - प्रतिनिधी**

परिवहन विभागातील कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांवर शासनाने सकारात्मक भूमिका घेतल्याने आरटीओ कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप मागे घेण्यात आला असून, राज्यातील परिवहन विभागाचे कामकाज पूर्ववत सुरू होणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली. मंत्री सरनाईक म्हणाले की, परिवहन विभागातील कर्मचारी संघटनांनी विविध मागण्यांसाठी १६ जून २०२६ पासून बेमुदत संप पुकारला होता. या आंदोलनामुळे राज्यातील लाखो नागरिकांच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली होती. शासनाने या प्रश्नाकडे केवळ प्रशासकीय विषय म्हणून न पाहता कर्मचाऱ्यांच्या अपेक्षा आणि अडचणी समजून घेण्याच्या भूमिकेतून चर्चा केली. चर्चेनंतर शासनाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. कार्यालयीन अधीक्षक पदावरील तात्पुरत्या पदोन्नतीचे आदेश पुढील तीन महिन्यांसाठी तातडीने नूतनीकरण करण्यात येणार आहे. ही पदोन्नती ११ महिन्यांपर्यंत सुरू ठेवण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घेण्यात येणार आहे. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि प्रशासकीय अधिकारी पदांच्या २३ पदोन्नतींचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात आला असून मंजुरी मिळताच पदोन्नती आदेश काढण्यात येणार आहेत. मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, कार्यालयीन अधीक्षक आणि वर्ग-३ संवर्गातील सर्व पदांचे सेवा प्रवेश नियम लवकर अंतिम करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. लिपिक, टंकलेखक आणि वरिष्ठ लिपिक या पदनामांमध्ये बदल करून अनुक्रमे ‘परिवहन सहाय्यक’ आणि ‘वरिष्ठ परिवहन समन्वयक सहाय्यक’ अशी पदनामे देण्याबाबत शासन सकारात्मक असून त्यासाठीची प्रशासकीय प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

सहाय्यक पोलीस मोटार वाहन अभियोजन पदाच्या सेवा प्रवेश नियमांना अंतिम मंजुरी देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. वरिष्ठ लिपिक आणि कार्यालयीन अधीक्षक पदावरील कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत नियमानुसार तातडीने निर्णय घेण्याचे निर्देश परिवहन आयुक्तांना देण्यात आले आहेत; तसेच बदली कायदा २००५ संदर्भातील मागणीवरही प्रशासनाच्या गरजा आणि विद्यमान नियमांचा विचार करून आवश्यक निर्णय घेण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले. मंत्री सरनाईक म्हणाले की, शासन कर्मचाऱ्यांचा सन्मान, त्यांच्या समस्या आणि भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी कटिबद्ध आहे. संवाद, संवेदनशीलता आणि समन्वय या त्रिसूत्रीच्या माध्यमातून परिवहन विभाग अधिक सक्षम, कार्यक्षम आणि जनाभिमुख करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. त्यादृष्टीने घेतलेल्या सकारात्मक निर्णयांनंतर कर्मचारी संघटनांनी बेमुदत संप मागे घेतला असून त्यामुळे नागरिकांना होणारी गैरसोय दूर होईल.

# राज्यात घरकुल योजनेसाठी निधीची कमतरता नाही; वर्षभरात १५ लाख घरे पूर्ण बांधण्याचे उद्दिष्ट

## -ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे

**मुंबई - प्रतिनिधी**

राज्यातील प्रत्येक नागरिकाला स्वतःचे हक्काचे घर मिळावे यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. घरकुल योजनेच्या निधीबाबत कोणतीही कमतरता नसून लाभार्थ्यांच्या हप्त्यांचे पैसे कोणत्याही परिस्थितीत थांबणार नाहीत, अशी ग्वाही देत राज्यात पुढील एक वर्षात १५ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत सांगितले. सदस्य समीर कुणावर यांनी विधानसभेत यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला. यावेळी सर्वश्री सदस्य निलेश राणे, राहुल पाटील, सुधीर मुनगंटीवार आणि नाना पटोले यांनी उपप्रश्न उपस्थित केले. मंत्री गोरे म्हणाले की, मागील वर्षी राज्याला २९ लाखावर घरांचे उद्दिष्ट मिळाले होते. त्यापैकी २८.१७ लाख लाभार्थी निश्चित करून २७ लाख ८५ हजार ७२४ घरांना मंजुरी देण्यात आली. आतापर्यंत २६ लाखावर घरांना पहिला, १७ लाखावरघरांना दुसरा आणि ११ लाखावर घरांना तिसरा हप्ता वितरित करण्यात आला आहे; तसेच आजपर्यंत ६ लाख ५ हजार ५९६ घरे पूर्ण झाली असून एका वर्षात ६ लाख घरे पूर्ण करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

घरकुलाच्या निधीबाबत माहिती देताना ग्रामविकास मंत्री गोरे म्हणाले की, सन २०२५-२६ मध्ये ५ हजार २९० कोटी रुपये, तर २०२६-२७ मध्ये १३ हजार ९४७ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. केंद्र सरकारच्या स्पर्श या ऑनलाइन निधी वितरण प्रणालीमध्ये काही तांत्रिक अडचणी आल्याने हप्ते देण्यास विलंब झाला; मात्र आता ही प्रक्रिया सुरळीत सुरू असून कोणत्याही घरकुल लाभार्थ्याचे पैसे थांबणार नाहीत. घरकुलासाठी आवश्यक जमिनीच्या उपलब्धतेबाबतही शासन सकारात्मक आहे. जमीन उपलब्ध नसल्यास प्रति लाभार्थी एक लाख रुपयांपर्यंतची रक्कम जागा खरेदीसाठी देण्यात येत असल्याचेही मंत्री गोरे यांनी सांगितले.

## विधानसभा इतर कामकाज

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेचा लाभ सर्व पात्र शेतकऱ्यांना होणार – सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

**मुंबई -प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेच्या माध्यमातून राज्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना लाभ देऊन न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. पूर्वीच्या कर्जमाफी योजनेत लाभ मिळालेल्या १२ लाख ७१ हजार शेतकऱ्यांनाही यंदाच्या योजनेत समाविष्ट करण्याबाबत शासन सकारात्मक असून, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमार्फत लवकरच निर्णय घेतला जाईल, अशी माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विधानसभेत दिली. विधानसभेत नियम २९३ अन्वये प्रस्तावा अन्वये झालेल्या चर्चेला उत्तर देताना मंत्री पाटील बोलत होते. मंत्री पाटील म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी शेती, सिंचन आणि जलसंधारण क्षेत्रात दिलेल्या योगदानाच्या स्मरणार्थ या योजनेला त्यांचे नाव देण्यात आले आहे. शेतकरी हिताचे निर्णय घेणे हीच त्यांना खरी आदरांजली आहे. शेतकऱ्यांना वारंवार कर्जबाजारी व्हावे लागू नये आणि ते आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावेत यासाठी माजी मुख्य सचिव प्रवीणसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. अल्पमुदत, दीर्घमुदत, पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जांच्या संदर्भात समितीने विविध उपाययोजनांच्या शिफारशी केल्या आहेत. राज्यात यापूर्वी २०१७ मध्ये दीड लाख रुपये आणि २०१९ मध्ये दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्यात आली होती. नव्या योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी ‘वन टाइम सेटलमेंट’ (ओटीएस)ची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये थकीत कर्जाच्या दोन लाख रुपये शासन भरेल, तर उर्वरित रक्कम शेतकऱ्याने भरायची आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांचे खाते नियमित होऊन त्यांना पुन्हा कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. वन टाइम सेटलमेंटचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. व्यापारी बँकांनाही या प्रक्रियेत आवश्यक सवलती देण्यात येणार आहेत, असेही त्यांनी सांगितले. नियमितपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन निधी म्हणून ५० हजार रुपये देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये वेळेवर कर्ज परतफेड करण्याची सवय वाढेल आणि बँकिंग व्यवस्थाही अधिक सक्षम होईल. कर्जमुक्ती योजनेचा लाभ राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून, त्यासाठी सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात येणार आहे.

कोणताही पात्र शेतकरी या योजनेपासून वंचित राहू नये यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आल्या आहेत. नियमित कर्जफेड करणारे शेतकरी, सिबिल स्कोअर, अल्पभूधारक शेतकरी आदी बाबींबाबतही शासन सकारात्मक भूमिका घेत आहे. पात्र व अपात्र शेतकऱ्यांसाठीच्या अटी नव्याने घालण्यात आलेल्या नसून, पूर्वीच्या कर्जमाफी योजनांमधील निकषच लागू करण्यात आले आहेत. शेतीवर अवलंबून असलेल्या आणि खऱ्या अर्थाने गरजू शेतकऱ्यांना मदत करणे हाच या योजनेचा उद्देश आहे. राज्याची अर्थव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी शासन शेती क्षेत्राकडे विशेष लक्ष देत असल्याचेही मंत्री पाटील

## विधानसभा इतर कामकाज :२९३ अन्वये प्रस्तावावरील उत्तर

# शेतकऱ्यांचे हित साधणारे सरकार –कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

## शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासनामार्फत व्यापक उपाययोजना करणार असल्याचे कृषिमंत्री यांचे विधानसभेत उत्तर

**मुंबई - प्रतिनिधी**

शेतकरी सक्षमीकरण, कर्जमुक्ती, हवामान बदलाशी सामना, कृषी पायाभूत सुविधा, पीक विमा, कृषी यांत्रिकीकरण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यांसह विविध विषयांवर शासन व्यापक उपाययोजना राबवत असल्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत सांगितले. राज्य शासनाने अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ३६ हजार ५८५ कोटींची कर्जमुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. याचा लाभ ५६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना होणार असून लोकप्रतिनिधींच्या सूचना विचारात घेऊन जास्तीत जास्त शेतकऱ्यांना दिलासा देत शेतकऱ्याचे हित साधणारे हे सरकार असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. विधानसभेत नियम २९३ अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी राज्य शासन शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना’ जाहीर करण्यात आली आहे. ही राज्यातील आतापर्यंतची सर्वांत मोठी कर्जमाफी योजना ठरणार आहे. या योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतच्या थकीत कर्जाची कर्जमुक्ती, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान तसेच महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेच्या लाभार्थ्यांसाठीही विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. या योजनेचा लाभ सुमारे ५६.२४ लाख शेतकऱ्यांना होणार असून ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमुक्ती देण्यात येणार आहे.

खरीप २०२६ हंगामात एल निनोच्या संभाव्य परिणामांचा विचार करून शासनाने व्यापक पूर्वतयारी केली आहे. कमी पावसात तग धरणाऱ्या वाणांचे बियाणे उपलब्ध करून देणे, बीबीएफ तंत्रज्ञानाद्वारे पेरणीस प्रोत्साहन, शेततळी, सूक्ष्म सिंचन, मल्चिंग यांसारख्या उपाययोजनांवर भर देण्यात येत आहे. कृषी समृद्धी योजनेसाठी सन २०२६-२७ मध्ये दोन हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आहे. ड्रोन, शेतकरी सुविधा केंद्रे, जैविक शेती आणि कृषी पायाभूत सुविधा उभारणीस प्राधान्य दिले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. शेती व्यवसाय करताना मृत्यू किंवा अपंगत्व आल्यास दिल्या जाणाऱ्या सानुग्रह अनुदान योजनेत शेतमजुरांचाही समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आहे. महाडीबीटी पोर्टलमार्फत ही योजना ऑनलाइन राबविण्यात येणार असून शेतकऱ्यांना कार्यालयीन प्रक्रियेचा त्रास होणार नाही, पीएम किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत राज्यातील १ कोटी १६ लाख शेतकऱ्यांना आतापर्यंत ४२ हजार ९०० कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेतून १४ हजार ८१६ कोटी रुपयांचे वितरण करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. कापूस उत्पादकता वाढविण्यासाठी केंद्र पुरस्कृत विशेष अभियान राबविण्यात येत असून प्रति हेक्टर उत्पादन १० ते ११ क्विंटलवरून १५ ते १६ क्विंटलपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी सन २०२६-२७ मध्ये १९१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत खरीप २०२५ मध्ये १७.१७ लाख शेतकऱ्यांना १ हजार ५८२ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली आहे. त्यापैकी ९६ टक्के लाभार्थ्यांना रक्कम वितरित झाली आहे. फळपीक विमा योजनेअंतर्गतही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे मंत्री भरणे यांनी सांगितले. राज्यात खरीप हंगामासाठी आवश्यकतेपेक्षा अधिक बियाणे आणि खतांचा साठा उपलब्ध असल्याची माहिती देताना मंत्री भरणे यांनी सांगितले की, खतांच्या विक्रीत होणाऱ्या ‘लिंकिंग’ प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर निर्बंध लागू करण्यात आले आहे. कृषी निविष्ठांबाबत तक्रारींसाठी टोल फ्री क्रमांक आणि व्हॉट्सअ‍ॅप सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दर्जाहीन व बनावट कृषी निविष्ठांविरोधात राज्यभरात विशेष मोहीम राबविण्यात येत असून ६९ हजारांहून अधिक विक्रेत्यांची तपासणी, ९७० मेट्रिक टन साठा जप्ती, १ हजार ८८ विक्रेत्यांचे परवाने निलंबित आणि ९४ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात २१ जिल्ह्यांतील ७,२०१ गावांमध्ये सहा हजार कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक करण्यात येणार आहे. तसेच स्मार्ट प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्या, गोदामे, कोल्ड

# ‘ऑपरेशन लोटस-टायगर यशस्वी झाले, आता ‘ऑपरेशन पब्लिक’ राबवा’ - ॲड. महेश धन्नावत यांची मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना साद

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील नागरी समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याच्या पार्श्वभूमीवर ॲड. महेश धन्नावत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ‘ऑपरेशन पब्लिक’ राबवण्याची आर्त विनंती केली आहे. ते म्हणाले, ‘‘राज्यात ‘ऑपरेशन लोटस’ आणि ‘ऑपरेशन टायगर’ यशस्वी झाले, सत्ता स्थापन झाली. आता जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे लक्ष देण्यासाठी ‘ऑपरेशन पब्लिक’ हाती घ्या व लोकांना खऱ्या अर्थाने सार्वजनिक सेवा द्या.’’ जालना महानगरपालिकेत सध्या भाजपची सत्ता असून बहुमतही त्यांच्याकडेच आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा पक्ष विरोधात असला तरी नगरविकास खाते स्वतः शिंदे यांच्याकडेच आहे. असे असतानाही शहरातील अनेक भागात उघडी गटारे, असमान मॅनहोलची झाकणे व स्वच्छतेसाठी उघडी ठेवलेली मॅनहोल ही डोकेदुखी ठरली आहे. विशेषतः कालीकुर्ती परिसरात मॅनहोलची झाकणे उंच-सखल असून काही ठिकाणी ती जड असल्याने साफसफाईसाठी उघडीच ठेवली जातात.

सध्या पावसाळा सुरू असून रस्त्यांवर पाणी साचत आहे. अशा वेळी रात्री-अपरात्री पाण्याखाली न दिसणाऱ्या उघड्या मॅनहोलमुळे मोठा अपघात घडण्याची शक्यता आहे. नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही, वृत्तपत्रांत बातम्या येऊनही प्रशासन ढिम्म आहे. ॲड. धन्नावत यांनी याकडे लक्ष वेधताना सांगितले की, ‘‘‘मिशन लोटस’च्या माध्यमातून निवडून आलेले नगरसेवकही यावर बोलायला तयार नाहीत. सत्ताधारी व विरोधक दोघेही मूग गिळून गप्प आहेत. म्हणूनच जालन्यात आता ‘मिशन पब्लिक’ची नितांत गरज निर्माण झाली आहे.’’

ॲड. महेश धन्नावत पुढे म्हणाले, ‘‘नगरविकास खाते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. त्यांनी जालन्याकडे विशेष लक्ष देऊन तातडीने निधी मंजूर करावा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही भाजपच्या नगरसेवकांना जनतेच्या प्रश्नांवर बोलण्याचे आदेश द्यावेत. केवळ सत्ता मिळवणे हे ध्येय नसून जनतेला रस्ते, गटार, पाणी या मूलभूत सुविधा देणे हे खरे ‘ऑपरेशन’ आहे. राजकारण बाजूला ठेवून आता ‘ऑपरेशन पब्लिक’ सुरू करा, अन्यथा जनता रस्त्यावर उतरेल.’’

शहरातील सुजाण नागरिकांनीही या मागणीला पाठिंबा दिला आहे. पावसाळ्यात एखादा जीव गेल्यास त्याला जबाबदार कोण, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

न्याय प्रणालीमध्ये वकिलांचा सक्रिय सहभाग ही काळाची गरजः

# जालना शहर महानगरपालिके तर्फे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना पुण्यतिथीनिमित्त भावपूर्ण अभिवादन

**जालना - प्रतिनिधी**



जालना शहर महानगरपालिकेच्या वतीने दिनांक २३ जून २०२६ रोजी भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी जालना शहर महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती वंदना मगरे, उपमहापौर श्री. राजेश राऊत तसेच महानगरपालिका आयुक्त श्रीमती अंजली शर्मा (भा.प्र.से.) यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

या प्रसंगी नगरसेवक सर्वश्री वीरेंद्र धोका, रमेश गौरक्षक, सिद्धिविनायक मुळे आणि कल्याण भदनेकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. यासोबतच महानगरपालिकेचे विविध विषय समिती प्रमुख, विभागप्रमुख आणि कर्मचारी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना आदरांजली वाहण्यासाठी उपस्थित होते.

# अपर जिल्हादंडाधिकारी यांचे कलम ३७ (१) व ३७ (3) अन्वये आदेश जारी

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यात दि.१७ जुन, २०२६ ते दि. २६ जुन,२०२६ या कालावधीत मोहरम सण साजरा होणार आहे. दि. २६ जुन,२०२६ रोजी छत्रपती संभाजी महाराज जयंती (तिथीप्रमाणे) व छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी करण्यात येणार आहे.तसेच दि. २९ जुन,२०२६ रोजी वटपोर्णिमा इत्यादी सण, जयंती, उत्सव साजरे होणार आहेत. या सण, उत्सव, जयंतीच्या अनुषंगाने जिल्ह्यात व शहरात मिरवणुका व विविध कार्यक्रम आयोजित होतात. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरीक एकत्र येत असतात.

तसेच मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण बचाव,धनगर समाज तसेच बंजारा समाज एस.टी. प्रवर्गात समाविष्ट करावा यासाठी विविध प्रकारचे आंदोलने होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारात येत नाही.

तसेच महाराष्ट्रात राजकीय दृष्ट्या सत्ताधारी व विरोधकात एकमेकांविरुध्द गटबाजी व आरोप प्रत्यारोप विविध कारणांवरुन सुरु आहे. तसेच शेतक-यांचे विविध मागणीसाठी विविध संघटनांकडून आत्मदहन, उपोषण, धरणे, मोर्चे, निदर्शने, रास्तारोको इत्यादी सर्व प्रकारची आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्याअनुषंगाने अपर जिल्हादंडाधिकारी जालना यांना प्राप्त अधिकारानुसार पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी किंवा त्या आसपास शस्त्रे, लाठ्या, सोटे, बंदुके, तलवारी , भाले, चाकु व इतर शरीरास इजा अथवा अपाय करणा-या वस्तु जवळ बाळगणार नाही. तीक्ष्ण पदार्थ अथवा स्फोटके सहज हाताळता येतील अशी घातक वस्तु जवळ बाळगणार नाही. दगड किंवा इतर उपकरणे किंवा प्रवर्तक शस्त्रे गोळा करुन ठेवणार नाही किंवा जवळ बाळगणार नाही. व्यक्तींच्या किंवा समुहाच्या भावना जाणुनबुजुन दुखविण्याचे उद्देशाने असभ्यतेने भाषण म्हणणार नाही, वाद्य वाजविणार नाही, गाणे म्हणणार नाही. व्यक्तींचे किंवा शवाचे किंवा त्याच्या प्रतिकृतीचे प्रदर्शन करणार नाही. आवेषी भाषण, अंगविक्षेप,विडंबनापर नकला करणार नाही आणि सभ्यता किंवा नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा कोणतीही वस्तु बाळगणार नाही.

तसेच अपर जिल्हादंडाधिकारी जालना यांना प्राप्त अधिकारानुसार पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये पाच किंवा अधिक व्यक्तींना जमण्यास किंवा सभा, मिरवणुका, मोर्चा काढण्यास मनाई केली आहे. हा आदेश कामावरील कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांना लागु होणार नाही. तसेच विवाह, अंत्ययात्रा आणि पोलीस अधिक्षक जालना व उपविभागीय पोलीस अधिकारी जालना, अंबड, परतुर *(पान २ वर)*

# बँकेच्या हलगर्जीपणाचा ग्राहकाला फटका: गहाण ठेवलेले मूळ ‘पट्टायम’ गहाळ, ग्राहक आयोगाकडून सेंट्रल बँकेला अडीच लाखाचा दंड

**जालना - प्रतिनिधी**

कर्जदाराने कृषी कर्जासाठी तारण म्हणून ठेवलेले जमिनीचे मूळ मालकीपत्र (पट्टायम) गहाळ केल्याप्रकरणी थ्रिसूर येथील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने सेंट्रल बँक ऑफ इंडियाला सेवेत त्रुटी आढळल्याबद्दल दोषी ठरवले आहे. आयोगाने बँकेला पीडित ग्राहकास २.५ लाख रुपये नुकसान भरपाई आणि १०,००० रुपये कायदेशीर खर्च म्हणून देण्याचे निर्देश दिले आहेत. या रकमेवर वार्षिक ९% व्याज देण्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. हा निकाल अध्यक्ष सी.टी. साबू, सदस्य श्रीमती श्रीजा एस. आणि श्री. राम मोहन आर. यांच्या खंडपीठाने दिला.या प्रकरणातील तक्रारदार, सत्यवल्ली आणि त्यांचे पुत्र ससींद्रन यांनी २०१४ मध्ये सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या थानिक्कुडम शाखेतून ३ लाख रुपयांचे कृषी कर्ज घेतले होते. या कर्जासाठी सत्यवल्ली यांनी त्यांच्या मालकीची मडक्कथारा गावातील ०.८९०३ हेक्टर जमिनीचे मूळ पट्टायम बँकेकडे सुरक्षा म्हणून जमा केले होते. २०१८ मध्ये, जेव्हा ससींद्रन अतिरिक्त कर्जासाठी बँकेत गेले, तेव्हा त्यांना बँकेकडून सांगण्यात आले की त्यांचे मूळ पट्टायम सापडत नाहीये. अनेक वर्षांच्या पाठपुराव्यानंतर, अखेरीस फेब्रुवारी २०२३ मध्ये बँकेने लेखी स्वरूपात कागदपत्र गहाळ झाल्याचे कबूल केले.मूळ कागदपत्र गहाळ झाल्यामुळे मालमत्तेची विक्री करणे, त्यावर अधिक कर्ज घेणे किंवा इतर कोणताही आर्थिक व्यवहार करणे अशक्य झाले आहे. यामुळे आपले मोठे आर्थिक नुकसान झाले असून प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागला आहे, असे तक्रारदारांनी आयोगापुढे मांडले आणि २० लाख रुपयांच्या नुकसान भरपाईची मागणी केली. बँकेने नोटीस मिळूनही वेळेत आपले लेखी म्हणणे सादर केले नाही, त्यामुळे सुरुवातीला त्यांच्या अनुपस्थितीतच कामकाज चालले. नंतर बँकेला बाजू मांडण्याची संधी देण्यात आली.बँकेने असा युक्तिवाद केला की, तक्रारदारांनी कर्जाची वेळेवर परतफेड केली नाही, त्यामुळे त्यांना कागदपत्रे परत मागण्याचा अधिकार नाही. तसेच, ससींद्रन यांना त्यांच्या आईच्या वतीने तक्रार दाखल करण्याचा अधिकार (लोकस स्टँडी) नाही. तथापि, आयोगाने बँकेचे दोन्ही युक्तिवाद फेटाळून लावले. आयोगाने स्पष्ट केले की, कर्जदारांनी संयुक्तपणे तक्रार दाखल केली आहे आणि बँकेच्या नोंदीनुसार दोघेही कर्जदार आहेत. शिवाय, कर्जदाराने कर्जाची परतफेड केली नाही, या कारणास्तव बँक आपली कागदपत्रे सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी टाळू शकत नाही.आयोगाने आपल्या निरीक्षणात म्हटले आहे की, बँक ग्राहकाने विश्वासाने ठेवलेल्या मौल्यवान कागदपत्रांची विश्वस्त () असते आणि त्यांची अत्यंत काळजीपूर्वक सुरक्षा करणे हे बँकेचे कायदेशीर बंधन आहे. मूळ मालकीपत्र गहाळ झाल्यामुळे तक्रारदारांना त्यांची मालमत्ता विकताना योग्य बाजारभाव मिळणार नाही किंवा त्यावर इतर कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज उभारता येणार नाही. जरी तक्रारदारांनी संपूर्ण कर्ज फेडले तरी, बँक त्यांना मूळ कागदपत्र परत करू शकणार नाही, ज्यामुळे त्यांचे मोठे नुकसान होईल. या निष्कर्षासाठी *(पान २ वर)*

# जालन्यात महावितरणच्या ओव्हरलोडिंगमुळे ग्राहक हैराण; सबस्टेशनच्या विस्तारीकरणासाठी नायब तहसीलदारांना निवेदन

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील महावितरण कंपनीच्या ढिसाळ नियोजनामुळे नागरिकांना दररोज दर पाच मिनिटाला वीज खंडित होण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब वानखेडे यांच्या नेतृत्वाखाली नायब तहसीलदार तायडे यांना एक सविस्तर निवेदन दिले आहे.




या निवेदनात जालना शहरातील वीज वितरण व्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याचे सांगत यंत्रणेच्या विस्तारीकरणाची आणि नवीन उपकेंद्रांची मागणी करण्यात आली आहे. जालना शहरातील एम.आय.डी.सी. १३२ केव्ही केंद्रातून मोतीबाग आणि सर्वे क्र. ४८८ येथील ३३ केव्ही उपकेंद्रांना विद्युत पुरवठा केला जातो. मात्र, सर्वे क्र. ४८८ मधील उपकेंद्रावर ११ केव्हीचे १३ फिडर, २ ग्रामीण फिडर आणि १ गावठाण फिडर असे एकूण १६ फिडर कार्यरत आहेत. तसेच मोतीबाग उपकेंद्रावर ११ केव्हीचे ४ फिडर आहेत. या अतिरिक्त भारामुळे १३२ केव्ही मुख्य स्टेशनमधून वीज पुरवठा ओव्हरलोड होतो आणि फिडर ट्रिप होतात.

सर्वे क्र. ४८८ उपकेंद्रामध्ये १० एमव्हीएचे दोन आणि ५ एमव्हीएचा एक असे पॉवर ट्रान्सफॉर्मर आहेत. येथून जोडलेले राममंदिर, सॅटेलाईट, समर्थ नगर, टीव्ही सेंटर, योगेश नगर, मेडिकल कॉम्प्लेक्स, मेडिकल एक्सप्रेस, रेल्वे एक्सप्रेस, कलेक्टर ऑफिस, कलेक्टर बंगलो, तसेच कृषी वाहिनी-२ मधील दरेगाव, सिरसवाडी, पिरपिंपळगाव हे फिडर सतत ट्रिप होत आहेत. मोतीबाग *(पान २ वर)*

# धावडा येथील गट क्र. ३८० प्रकरण तापले; सातबारावरील नावे वगळल्याप्रकरणी शेतकऱ्यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव

## नोटीस न देता मालकी हक्क रद्द केल्याचा आरोप; चौकशी समितीचा अहवाल डावलल्याचा दावा

**भोकरदन । प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील धावडा येथील गट क्रमांक ३८० मधील जमिनीच्या मालकी हक्काचा वाद पुन्हा एकदा चिघळला असून, प्रशासनाने कोणतीही पूर्वसूचना अथवा सुनावणी न देता सातबारावरील मालकी हक्कातील नावे कमी करून शासनाचे नाव नोंदविल्याचा गंभीर आरोप संबंधित शेतकरी व नागरिकांनी केला आहे. या प्रकरणी संबंधित आदेश रद्द करून सातबारा उताऱ्यावरील मूळ नावे पूर्ववत करण्यात यावीत, या मागणीसाठी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे निवेदन सादर केले आहे.



मंगळवार, दि. २३ जून रोजी दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात आलेल्या निवेदनात उपजिल्हाधिकारी (सामान्य) जालना यांनी ११ जून २०२६ रोजी दिलेल्या आदेशावर गंभीर आक्षेप नोंदविण्यात आला आहे. या आदेशाच्या आधारे तहसीलदार भोकरदन यांनी संबंधित जमिनीवरील मालकी हक्कातील नावे कमी करून शासनाचे नाव नोंदविण्याची कार्यवाही केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**धर्मादाय आयुक्तांच्या आदेशाकडे दुर्लक्ष केल्याचा दावा**

निवेदनानुसार, संबंधित आदेशात धर्मादाय आयुक्त कार्यालयाचा अहवाल उपलब्ध नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, सहधर्मादाय आयुक्त यांनी १२ जानेवारी १९९० रोजी बालाजी देवस्थानाच्या जमिनीच्या विक्रीस परवानगी दिलेला आदेश अस्तित्वात असल्याचा दावा अर्जदारांनी केला आहे. संबंधित जमिनीच्या व्यवहारासंदर्भात अनेक वर्षांपासून विविध स्तरांवर पडताळणी सुरू असून, त्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी भोकरदन यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समितीची स्थापना करण्यात आली होती. या समितीने धर्मादाय आयुक्त कार्यालयातील कागदपत्रांची तपासणी करून जिल्हाधिकाऱ्यांना १२ मार्च २०२६ रोजी सविस्तर अहवाल सादर केल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

**चौकशी समितीच्या अहवालाकडे दुर्लक्ष?**

निवेदनात असा आरोप करण्यात आला आहे की, चौकशी समितीने १९९० मधील परवानगी आदेशाची पुष्टी केल्यानंतरही त्या अहवालाचा विचार करण्यात आला नाही. उलट उपजिल्हाधिकारी (सामान्य) तसेच तहसीलदार यांनी संबंधित शेतकऱ्यांची नावे मालकी हक्कातून वगळण्याची कार्यवाही केली.

विशेष म्हणजे, ही *(पान २ वर)*



मस्तगड येथे उतारावर पाईपलाईनचे काम चालू असून तेथे मोठा खड्डा पडलेला आहे त्यामुळे रहदारीला येण्यास अडथळा होत आहे छायाचित्र किरण खानापुरे





जालना येथे काल रात्री दोन वाजेपासून बऱ्याच विश्रांतीनंतर जोरदार पावसाने हजेरी लावली सकाळी सात वाजेपर्यंत पाऊस चालू होता या पावसामुळे लोकांची प्रारंभ उडाली छायाचित्र किरण खानापुरे

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.